**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे पोलीस आयुक्तांचे हस्ते उद्‌घाटन

## पाच राज्यांतील ६१ संघ व ७०० महिला खेळाडूंचा सहभाग

अमरावती.

महाराष्ट्र, गोवा, राजस्थान, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यातील ६१ विद्यापीठांचे महिला संघादरम्यान पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धाचे आयोजन ५ ते ९ डिसेंबर दरम्यान विद्यापीठ क्रीडा संकुलावर संपन्न होणार असून या क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन आज सकाळी अमरावतीचे पोलीस आयुक्त श्री संजय बाविस्कर यांचे शुभहस्ते करण्यात आले. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, व्य.प. सदस्य डॉ. प्रदीप खेडकर, डॉ. मिनल ठाकरे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विदर्भ कबड्डी फेडरेशनचे सदस्य श्री सतिश डफळे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, क्रीडा व शारीरिक मंडळाचे सदस्य प्रमोद चांदुरकर उपस्थित होते.

मैदानाची पूजा अतिथींच्या हस्ते पार पडली. उद्‌घाटनपर भाषणात बोलतांना पोलीस आयुक्त श्री बाविस्कर म्हणाले, स्पर्धेत शिस्त महत्वाची असून सर्व खेळाडू शिस्त ठेवून आपल्या नैसर्गिक खेळाचे प्रदर्शन करतील. स्पर्धेत जय-पराजय होणारच, त्यामुळे ज्यांचा विजय झाला त्यांचे अभिनंदन व ज्यांचा पराजय होईल त्यांना पुढील स्पर्धेतील विजयासाठी शुभेच्छा त्यांनी याप्रसंगी दिल्यात.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रदीप खेडकर म्हणाले, स्पर्धेत ७०० खेळाडू सहभागी झाले असून ते आपल्या नगरीचे सौभाग्य आहे. सहभागी महिला खेळाडूंचे क्रीडा कौशल्य आम्हाला बघायला मिळणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध महाविद्यालयांतील क्रीडा संचालक व विद्यापीठातील क्रीडा विभाग परिश्रम घेत असल्याचे ते म्हणाले. डॉ. मिनल ठाकरे यांनी खेळाडू सचोटीने खेळ खेळण्यासाठी आपल्यातील सच्चेपणा पणाला लावतील, अशी अपेक्षा व्यक्त करुन सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्यात.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, कबड्डी हा भारताचा खेळ आहे. ७०० महिला खेळाडू, पाच राज्यांतील ६१ चमू या स्पर्धेत सहभागी होत आहेत. एकमेकांचा हात पकडून, साखळी करुन सांघीक प्रयत्नाने खेळल्या जाणारा कबड्डी हा एकमेव खेळ आहे. लक्षप्राप्तीसाठी खेळाडू सांघीक खेळ खेळतात, विजय मिळवितात. मनाचा निश्चय, सामुहिक प्रयत्न यामुळे नकारात्मकता दूर होवून कोणाला हरविण्यापेक्षा स्वतःला जिंकण्याच्या भावनेने हा खेळ प्रत्येकाच्या खाजगी जीवनाला प्रेरणा देत असतो. सर्व संघांचे खेळाडू आपल्या संघाला विजय प्राप्त करुन देण्यासाठी यशस्वी प्रयत्न करतील, असा आशावाद व्यक्त करुन त्यांनी सर्व खेळाडूंना उत्कृष्ट प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ गीताने उद्‌घाटन कार्यक्रमाला सुरुवात झाली. अतिथींचे शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देवून स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी व स्वागतपर भाषण कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले. संचालन डॉ. विजय पांडे यांनी, तर आभार डॉ. अविनाश असनारे यांनी मानले. उद्‌घाटन समारंभाला पाचही राष्ट्रातील महिला खेळाडू, संघाचे प्रशिक्षक, व्यवस्थापक, निरीक्षक, विविध समित्यांचे सभासद, क्रीडा संचालक, क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०५/१२/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी